आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२९ एप्रिल २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात संध्याकाळी पाच वाजेपर्यंत ९० टक्के मतदान

- उत्तर प्रदेशात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते ५९४ किलोमीटर लांबीच्या प्रवेश नियंत्रित ग्रीनफिल्ड गंगा द्रुतगती महामार्गाचं उद्घाटन

- महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर /दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक, दीड लाखापेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार

- नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणी शरद कळसकरला उच्च न्यायालयाकडून जामीन मंजूर

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ६०९ अंकांची वाढ

**<><><><><>**

पश्चिम बंगाल विधानसभेच्या दुसऱ्या आणि शेवटच्या टप्प्यात १४२ मतदारसंघांमध्ये आज संध्याकाळी पाच वाजेपर्यंत सुमारे ९० टक्के मतदान झालं. सर्वात जास्त मतदान पूर्व वर्धमान जिल्ह्यात ९२ पूर्णांक ५ दशांश टक्के, तर सगळ्यात कमी मतदान कोलकाता दक्षिण या मतदार संघात ८६ पूर्णांक ११ शतांश टक्के इतकं झालं आहे.

काही ठिकाणच्या किरकोळ घटना वगळता आज मतदान शांततेत झालं. भवानीपूर मतदारसंघातल्या एकबलपूरमध्ये भाजपा नेते सुवेंदू अधिकारी यांच्या विरोधात घोषणा देण्यात आल्या. पोलीस तसंच केंद्रीय सुरक्षा दलांनी परिस्थिती आटोक्यात आणली. फाल्ता मतदारसंघातल्या काही मतदान केंद्रांवर भाजपा उमेदवारांच्या नावापुढच्या बटनावर सेलो टेप लावली होती असे आरोप करत भाजपानं त्या मतदान केंद्रावर पुन्हा मतदान घेण्याची मागणी केली आहे.

**<><><><><>**

उत्तर प्रदेशामधल्या हरदोई जिल्ह्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ३६ कोटी २३० लाख रुपये खर्चाच्या ५९४ किलोमीटर लांबीच्या प्रवेश नियंत्रित ग्रीनफिल्ड गंगा द्रुतगती महामार्गाचं उद्घाटन आज झालं.

हजारो वर्षांपासून गंगा नदी उत्तर प्रदेशाची जीवनरेखा आहे, तसंच गंगा द्रुतगती महामार्गामुळे राज्याच्या विकासाची नवी जीवनरेखा ठरेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्र्यांनी महामार्गाच्या उद्घाटनानंतर हरदोई इथं घेतलेल्या सभेत केलं. या द्रुतगती महामार्गामुळे राज्यातील संपर्क व्यवस्थेत सुधारणा होईल. तसंच औद्योगिक गुंतवणूक, लॉजिस्टिक्स, शेतीमालाची विक्री आणि प्रादेशिक समतोल विकासाला चालना मिळेल, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

**- - होल्ड बाईट प्रधानमंत्री - -**

उत्तर प्रदेश एक्सप्रेसवेज इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट प्राधिकरणानं विकसित केलेला हा महामार्ग राज्यातील पश्चिम, मध्य आणि पूर्व भागांना एकाच मार्गाने जोडणार आहे. हा राज्यातील सर्वात लांब एक्सप्रेसवे ठरणार आहे. सहा मार्गिका असलेला हा द्रुतगती महामार्ग १२ जिल्ह्यांतून जाणार असून मेरठ ते प्रयागराज हे अंतर अवघ्या ६ तासांत गाठता येणार आहे.

**<><><><><>**

कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात राज्यानं महत्त्वाकांक्षी पाऊल टाकत महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण २०२६ जाहीर केलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र  फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. या धोरणांतर्गत राज्यात दहा हजार कोटींपेक्षा अधिक गुंतवणूक होणार असून दीड लाखांपेक्षा जास्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. राज्यभरात सहा एआय उत्कृष्टता केंद्रांची स्थापन होणार असून पाच एआय इनोव्हेशन शहरांची स्थापना करण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला. याशिवाय लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स या प्रख्यात संस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही या बैठकीत झाला.

राज्यात तीनशे कोटी वृक्ष लागवडीकरता महत्त्वाकांक्षी वृक्षारोपण मोहीम हाती घेतली असून हरित महाराष्ट्र आयोगाच्या स्थापनेचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

**<><><><><>**

विधानपरिषदेच्या आगामी निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने अंबादास दानवे यांच्या नावाची घोषणा केली आहे. ते उद्या उमेदवारी अर्ज दाखल करतील असं खासदार संजय राऊत यांनी सांगितलं. दुसरीकडे काँग्रेसही या निवडणुकीत उमेदवार देणार असल्याचं प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केलं आहे. तर विधानपरिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी भाजपाने प्रज्ञा सातव यांना उमेदवारी दिली आहे. प्रज्ञा सातव यांनी काही महिन्यांपूर्वी विधानपरिषद सदस्यपदाचा राजीनामा देत भाजपामधे प्रवेश केला होता.

**<><><><><>**

कुख्यात दहशतवादी दाऊद इब्राहिमचा निकटवर्तीय असलेला अमली पदार्थांचा तस्कर मोहम्मद सलीम डोला याला एनसीबी अर्थात अंमली पदार्थविरोधी पथकाने आज दिल्लीहून मुंबईला आणलं. डोला याला तुर्कियेतून भारतात परत आणण्याची प्रक्रिया एनसीबीने काल पूर्ण केल्यानंतर त्याला दिल्लीत आणण्यात आलं होतं. दिल्लीतल्या एका न्यायालयाने काल दोन दिवसांची तात्पुरती कोठडी दिली. भारताच्या विनंतीवरून मार्च २०२४मध्ये जारी केलेल्या इंटरपोल नोटीसीच्या आधारावर डोला याला तुर्कियेत अटक करण्यात आली होती. भारतातल्या अंमली पदार्थांच्या तस्करीशी संबंधित विविध प्रकरणांमध्ये पोलिसांना तो हवा होता.

**<><><><><>**

नरेंद्र दाभोळकर हत्या प्रकरणातला आरोपी शरद कळसकर याचा जामीन अर्ज मुंबई उच्च न्यायालयानं आज मंजूर केला. या प्रकरणी सत्र न्यायालयानं कळसकरला दोषी ठरवलं आहे. या निकालाविरोधात कळसकरनं मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. गोविंद पानसरे यांच्या हत्येप्रकरणीही कळसकरवर खटला सुरु आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज दिवसअखेर ६०९ अंकांची वाढ झाली, आणि तो ७७ हजार ४९६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १८२ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार १७८ अंकांवर बंद झाला.

ग्राहकोपयोगी वस्तू, स्थावर मालमत्ता, उर्जा इत्यादी क्षेत्रांमधल्या कंपन्यांचे समभाग आज तेजीत राहिले.

आज रुपया ३० पैशांनी घसरला. परकीय चलन विनिमय बाजारात हा दर प्रतिडॉलर ९४ रुपये ८५ पैसे इतका राहिला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज मुंबईत वानखेडे मैदानावर, मुंबई इंडियन्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा मुंबई इंडियन्सच्या ८व्या षटकात १ बाद ९३ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

बंगळुरू इथे मुसळधार पावसामुळे एका रुग्णालयाची संरक्षक भिंत कोसळून झालेल्या अपघातात ७ जण मृत्युमुखी पडले.यात ३ मुलांचा समावेश आहे. बोरिंग अँड लेडी कर्झन रुग्णालयात हा अपघात घडला.

<><><><><>

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी इक्वेडोरचे परराष्ट्र व्यवहार मंत्री गॅब्रिएला सोमरफील्ड यांची आज नवी दिल्ली इथं भेट घेतली. व्यापार, कृषी आणि क्षमता विकास या मुद्द्यांवर दोन्ही नेत्यांमधे यावेळी चर्चा झाली. भारताच्या नेतृत्वाखालच्या इस्त्रो सोलार अलायन्स आणि इंटरनॅशनल बिग  कॅट अलायन्स मधे सहभागी होण्याच्या इक्वेडोरच्या निर्णयाचं जयशंकर यांनी स्वागत केलं. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी मारिया गॅब्रिएला यांच्याबरोबर द्विपक्षीय बैठक घेतली.

<><><><><>

जनगणना-2027 अंतर्गत स्व-गणना करण्यासाठी महानिबंधक कार्यालय आणि जनगणना आयुक्त कार्यालयानं एक समर्पित वेब पोर्टल https://se.census.gov.in विकसित केलं आहे. महाराष्ट्रासाठी, हे पोर्टल 1 मे ते 15 मे 2026 पर्यंत कार्यरत राहील. घरातला कोणताही एक सदस्य सुमारे 15 ते 20 मिनिटांत स्व-गणना प्रक्रिया पूर्ण करून कुटुंबाचा तपशील भरु शकतो आणि नोंदणीकृत मोबाईल नंबर किंवा ई-मेलवर एसई, अर्थात स्वयं-गणना आयडी मिळवू शकतो.

//<><><><><>//